**ठळक बातम्या**

- निवडणुका पर्यावरणपूरक करण्यासाठी निवडणूक यंत्रणा आणि राजकीय पक्षांसाठी निवडणूक आयोगाकडून मार्गदर्शक तत्वं जारी

- युनायटेड वेस्टर्न बँकेचा वा. ग. चिरमुले पुरस्कार जलपुरुष डॉ. राजेंद्रसिंह यांना जाहीर

- अहमदनगर इथं झालेल्या ७० व्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेचं विजेतपद हरियाणानं पटकावलं

**आणि**

- राज्यात सर्वत्र धूलिवंदनाचा सण उत्साहात साजरा

**<><><><><><>**

आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणूक पर्यावरणपूरक असावी यासाठी भारत निवडणूक आयोगानं निवडणूक यंत्रणा आणि राजकीय पक्षांसाठी मार्गदर्शक तत्वं जारी केली आहेत. मतदार यादी आणि निवडणूक साहित्यासाठी कागदाचा कमीत कमी वापर करावा, शक्यतो ई-बुक्स आणि ई-दस्तऐवजांचा वापर करावा, प्रिंट घेताना ती एका पानावर पाठपोट घ्यावी, एकदाच वापरून फेकून द्याव्या लागणाऱ्या प्लास्टिकचा वापर पूर्णतः टाळावा, संकलनाची स्वतंत्र व्यवस्था असावी, प्रत्येक प्रकारच्या कचऱ्यासाठी विल्हेवाटीची व्यवस्था असावी, वाहतुकीसाठी पर्यावरणपूरक वाहनं, एकाच वाहनांतून अनेकांनी प्रवास करणं,

सार्वजनिक वाहतूक याला प्रोत्साहन द्यावं, राजकीय पक्षांनी आपल्या प्रचार कार्यक्रमांमधे अक्षय ऊर्जेचा वापर करावा अशा सूचनांचा यात समावेश आहे.

शाश्वत निवडणुकांसाठी मतदान केंद्रांवर पोहचण्याचा वेळ कमी व्हावा यासाठी मतदान केंद्रांची ठिकाणं एकाच ठिकाणी आणण्याचा प्रयत्न करावा अशी सूचनाही आयोगानं केली आहे.

**<><><><><><>**

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी भाजपानं १११ जागांवरच्या उमेदवारांची पाचवी यादी जाहीर केली आहे. यात सोलापूर लोकसभा मतदारसंघातून राम सातपुते, भंडारा गोंदियातून सुनिल मेंढे आणि गडचिरोली चिमूर मतदारसंघात अशोक नेते यांना उमेदवारी घोषित केली आहे. कॉंग्रेसनं काल पाचवी यादी जाहीर केली. चंद्रपूर लोकसभा मतदारसंघातून माजी खासदार दिवंगत सुरेश धानोरकर यांच्या पत्नी प्रतिभा धानोरकर यांना उमेदवारी दिली आहे.

**<><><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या जागावाटपाचा तिढा सोडवण्याच्या दृष्टीनं महायुतीतल्या नेत्यांच्या दोन बैठका झाल्या. बारामती मतदारसंघातले मतभेद दूर करण्यासाठी देवेंद्र फडनवीस यांनी अजित पवार आणि हर्षवर्धन पाटील यांच्याबरोबर चर्चा केली. त्याचप्रमाणे अहमदनगर दक्षिण मतदारसंघातले वाद मिटवण्यासाठी फडनवीस यांनी राम शिंदे, सुजय विखे आणि राधाकृष्ण विखे पाटील यांच्याबरोबर चर्चा केली.

**<><><><><><>**

भारत बायोटेक इंटरनॅशनल लिमिटेड या लस बनवणाऱ्या कंपनीने भारतात प्रौढांवर क्षयरोग प्रतिबंधक लसीच्या म्हणजे एम टी बी व्हॅंकच्या चाचण्या सुरू

केल्या आहेत. बायोफॅब्री या स्पॅनिश बायो फार्मास्युटिकल कंपनीने मानवी स्त्रोताकडून मिळवलेली, ही क्षयरोग प्रतिबंधावरील पहिली लस आहे. या चाचण्या बायोफॅब्रिच्या सहकार्याने केल्या असल्याचं कंपनीने म्हटलं आहे. एचआयव्ही संक्रमित नसणाऱ्या प्रौढांमध्ये या लसीची मात्रा यापूर्वीच दिली असून, एम टी बी व्हँक ही लस सुरक्षित आहे की नाही हे निर्धारित करण्यासाठी आता एचआयव्ही बाधित प्रौढांना ही लस देऊन त्याच्या दुसऱ्या टप्प्याचा अभ्यास सुरू करण्यात आला असल्याचंही कंपनीने म्हटलं आहे.

**<><><><><><>**

येत्या शैक्षणिक सत्रात राज्यात पहिली ते आठवीच्या, ४४ लाख ६० हजार विद्यार्थ्यांना प्रत्येकी दोन गणवेशांचं वाटप करण्यात येणार आहे. यात एक नियमित गणवेश तर दुसरा स्काउट गाईडचा गणवेश असेल. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेकडून याबाबतचा 'कार्यारंभ' आदेश देण्यात आला असून बचत गटातील महिलांकडून हे गणवेश शिवून घेण्यात येणार आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याला गणवेशासाठी लागणारं ठराविक माप महिला आर्थिक विकास महामंडळाकडून नोंदवलं जाईल. एक गणवेश शिवून देण्यासाठी बचत गटांना ११० रुपये याप्रमाणे मोबदला दिला जाणार आहे.

**<><><><><><>**

पंढरपुरात विठ्ठल मंदिराच्या विकासाकरता सुरु असलेल्या ७३ कोटी रुपयांच्या आराखड्यातली कामं वेगानं सुरु असून विठ्ठल मंदिराला पुरातन, ७०० वर्षापूर्वीचं रूप येऊ लागले आहे.

सध्या विठ्ठल आणि रुक्मिणी मातेच्या गर्भगृहातली ग्रॅनाईट फरशी, फ्लोरिंग काढून टाकायचं काम अंतिम टप्प्यात असून संपूर्ण मंदिराला पुरातन काळातलं

दगडी फ्लोरिंग केलं जात आहे. मंदिरात नंतरच्या काळात बसवलेले मार्बल, ग्रॅनाईट आणि चकचकीत फारशांमुळे गाभाऱ्यात खूप मोठ्या प्रमाणात दमटपणा राहत होता. याचा त्रास भाविकांना होत होता, शिवाय मूर्तीवर देखील याचा विपरीत परिणाम जाणवत होता. त्यामुळे या फारशा तातडीनं हटवण्याच्या सूचना पुरातत्व विभागानं दिल्या होत्या.

**<><><><><>**

युनायटेड वेस्टर्न बँकेतर्फे त्यांचे संस्थापक वा. ग. चिरमुले यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा पुरस्कार २०२२ या वर्षासाठी डॉ. राजेंद्रसिंह यांना जाहीर झाला आहे. जलसंधारण आणि त्याचं व्यवस्थापन, निसर्ग पुनरुत्पादन, पर्यावरण आणि सामाजिक कार्यक्षेत्रातल्या त्यांच्या महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल राजेंद्रसिंह यांची या पुरस्कारासाठी निवड झाली आहे.

सन्मानचिन्ह आणि एक लाख रुपये असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. येत्या ३१ तारखेला साताऱ्यात राजेंद्रसिंह यांना हा पुरस्कार प्रदान केला जाईल. चिरमुले ट्रस्टने यापूर्वी माजी प्रधानमंत्री मनमोहन सिंग, विजय भटकर, डॉ. अनिल काकोडकर, रतन टाटा, राहुल बजाज, डॉ. सी. रंगराजन, गुलजार, डॉ. सायरस पूनावाला आदि आदरणीय व्यक्तिना या पुरस्कारानं गौरवलं असून आहे.

**<><><><><>**

अहमदनगर इथं झालेल्या ७० व्या वरिष्ठ पुरुष गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेचं विजेतेपद हरियाणानं पटकावलं. वाडिया पार्क क्रीडा संकुलात काल झालेल्या अंतिम सामन्यात त्यांनी भारतीय रेल्वेचा ३५-३० असा पराभव केला. आशू मलिक यानं १ बोनस आणि १२ गुणांसह १३ कमवत हरयाणाच्या विजयात महत्वाची भूमिका बजावली.

**<><><><><><>**

राज्यात सर्वत्र विविध पद्धतीनं होळी आणि धूलिवंदनाचा सण साजरा करण्यात आला.

मुंबईसह अनेक ठिकाणी काल होलिकादहनाचा उत्सव साजरा केल्यानंतर आज धूलिवंदनाच्या सणाचा उत्साह सर्वत्र दिसून आला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल ठाण्याच्या किसननगर परिसरात होलिकोत्सवात भाग घेतला.

**मुंबईत** धारावी इथं कोळी बांधवांनी पारंपरिक वेशभुषेसह शंकासुरही नाचवत होलिका दहनाचा उत्सव साजरा केला. यावेळी स्थानिकांनी पुनर्विकासाची पालखी नाचवली. खासदार राहुल शेवाळे यांनीही सोहळ्यात सहभाग नोंदवला.

**रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग** या तीनही जिल्ह्यांमध्ये शिमगोत्सव साजरा होत आहे. ग्रामदैवतांच्या पालख्या घरोघरी जात आहेत. अनेक ठिकाणी आज होळी पूजन, होलिका दहन झालं. गावागावात रोंबाट, धुलिवंदन आणि वेगवेगळ्या वेशभूषेतल्या नाच गाण्यांनी शिमगोत्सव साजरा होत आहे.

होळीनिमित्त **रत्नागिरीत** अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या खेड इथल्या कार्यकर्त्यांनी पाण्याने होळी पेटवून त्यामागचं विज्ञान उपस्थितांना सांगत अंधश्रद्धा निर्मूलनाचा अनोखा प्रयोग केला.

**वाशिममध्ये** बंजारा तांड्यातल्या महिलांनी पारंपारिक वेशभूषा आणि नृत्यानं धुळवड साजरी केली. बंजारा समाजाचा उत्सव गुडीपाडव्यापर्यंत चालणार आहे.

**यवतमाळ** जिल्ह्यात वागद ईजरा इथं बंजारा समाजानं पारंपरिक गाण्यांच्या ठेक्यावर लेंगी नृत्य करत होळी साजरी केली.

**नंदुरबारमध्ये** मोठ्या उत्साहात आदिवासी काठी संस्थानाचा रजवाडी होळी उत्सव झाला. देशविदेशातून आलेल्या पर्यटकांनीही या उत्सवाचा आनंद लुटला.

आज सकाळी सहाच्या सुमाराला हजारो आदिवासी बांधवांच्या उपस्थितीत होलिका दहन झालं. यावेळी पारंपरिक वाद्यांच्या तालावर त्यांनी नृत्य केलं.

**कोल्हापुरात** अनेक संस्थानी पर्यावरणपूरक होळीसाठी शेणी दानाचा उपक्रम राबवला.

<><><><><>

रत्नागिरी जिल्ह्यात राजापुर इथं सहा महिन्यांनंतर आज पुन्हा गंगा अवतरली. काशिकुंडासह चौदाही कुंडांमध्ये गंगेचं पाणी प्रवाहित झालं. गंगा देवस्थानच्या अध्यक्षांनी ही माहिती दिली. राजापूरमध्ये गंगा अवतरल्यानंतर अनेक ठिकाणांहून भाविक गंगास्नानासाठी येत असतात. २०१३ पूर्वी साधारण तीन वर्षांच्या कालावधीनंतर हे पाणी प्रवाहित होत असे, मात्र त्यानंतर जवळपास दर वर्षी पाणी प्रवाहित होत आहे.

भूगर्भातली विशिष्ट रचना, हालचाली किंवा सायफनसारख्या यंत्रणेमुळे हे घडत असल्याचं अनेक भूगर्भशास्त्रज्ञांचं मत आहे.

<><><><><>

दापोली सायकलिंग क्लबचे सूरज भुवड आणि किरण भुवड यांनी मुंबई ते दापोली असा २५० किलोमीटरचा प्रवास करून पर्यावरणपूरक होळी उत्सवाबद्दल जनजागृती केली. मुंबईतून २३ मार्चला संध्याकाळी ५ वाजता अंधेरीहून सुरू झालेला प्रवास दुसऱ्या दिवशी म्हणजे काल सकाळी १० वाजता आंबवली इथं संपला.

<><><><><>

जवाहरलाल नेहरू विद्यापीठातल्या विद्यार्थी संघाच्या निवडणुकीत डाव्या विचारसरणीच्या ऑल इंडिया स्टुडंट्स युनियनने अखिल भारतीय विद्यार्थी

परिषदेचा पराभव केला आहे. जवाहरलाल नेहरू युनिव्हर्सिटी स्टुडंट्स युनियन निवडणुकीत शुक्रवारी ७३ टक्के मतदान झालं. गेल्या १२ वर्षांत झालेल्या निवडणुकांमधे हे सर्वाधिक मतदान होतं.

**<><><><><>**

आयपीएल टी ट्वेन्टी क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चैलेंजर्स चा सामना पंजाब किंग्ज बरोबर होणार आहे. बंगळुरूच्या के. एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर हा सामना संध्याकाळी साडेसात वाजता सुरु होईल.

रॉयल चैलेंजर्स बंगळुरुनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात मराठवाड्यात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात लक्षणीय वाढ झाली आहे. मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात काही ठिकाणी, तर कोकणात तुरळक ठिकाणी किंचित वाढ झाली आहे.

येत्या दोन दिवसात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**